2 8 AUG 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवीन गोष्टीचा ध्यास घ्या : बागी

## जागतिक उद्योजकता दिन : उद्योजकता विकास कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क



भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी येथे जागतिक उद्योजकता दिनानिमित्त कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर, ओपेक्स सेंटर फॉर ट्रेनिंग अँड कन्सल्टन्सी यांच्यातर्फे 'कोल्हापूर उद्योजक २०१७' कार्यक्रमात प्राध्यापक, उद्योजक सहभागी झाले होते.

**कोल्हापूर** : विद्यार्थिदशेमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या सर्वांगीण विकासासाठी सतत नवीन गोष्टी शिकण्याचा ध्यास घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे डायरेक्टर डॉ. जयदीप बागी यांनी केले.

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी येथे जागतिक उद्योजकता दिनानिमित्त कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर आणि ओपेक्स सेंटर फॉर ट्रेनिंग अँड कन्सल्टन्सी यांच्यातर्फे 'कोल्हापूर उद्योजक २०१७' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

जयदीप बागी म्हणाले, विद्यार्थ्यांनी फक्त नोकरीच्या मागे न लागता, व्यवसायाच्या नवीन कल्पना अमलात आणल्या पाहिजेत तसेच आंतरराष्ट्रीय उद्योगामधील आमूलाग्र बदल लक्षात घ्यावा.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया म्हणाले, उद्योजकता विकास कार्यक्रम म्हणजे भावी उद्योजक घडविण्याची कार्यशाळाच आहे. अशा कार्यशाळेचा लाभ घेतला पाहिजे.

यावेळी प्रा. सचिन लोकापुरे, शहाजी शिंदे, अनुराग कोकीतकर, सिद्धार्थ शहा यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी स्टार्ट अप कनेक्ट प्रोग्रॉम आणि स्टार्ट अप फोरम असे दोन प्रोग्रॅम घेण्यात आले.

तसेच स्टार्ट अप आणि उद्योजकता, भारत सरकारच्या स्टार्ट अप इंडिया, मुद्रा योजना आणि पेटंट, कॉपीराईट, ट्रेडमार्क याबद्दलची माहिती देण्यात आली.

यावेळी भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक डॉ. अनिलकुमार शिंदे, डॉ. सचिन पिशवीकर, सचिन कुंभोजे, अंजोरी परांडेकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 AUG 2017
लोकमत

# 'इस्रो'कडून प्राप्त रिसीव्हर कार्यरत

लोकमत न्यूज नेटवर्क

पन्हाळा : येथील शिवाजी विद्यापीठाचे पन्हाळ्याचे अवकाश संशोधन केंद्र विद्यापीठाच्या नियम व अटींच्या अधीन राहून काम करत असून, इस्रोकडून प्राप्त झालेला रिसीव्हर मार्च २०१६ पासून अखंडित कार्यरत आहे, अशी माहिती विद्यापीठाचे पदार्थ विभागाचे प्रमुख प्रा. व्ही. जी. फुलारी व समन्वयक प्रा. ए. के. शर्मा यांनी दिली.

पदार्थविज्ञान विभागातील विद्यापीठातील विद्यार्थी इस्रोकडून मिळालेल्या रिसीव्हरद्वारे अभ्यास करत आहेत. पन्हाळा अवकाश संशोधन केंद्र उभारणीसाठी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या सूचनेनुसार व तात्पुरत्या परवानगीनुसार पत्र्याचे शेड उभे केले आहे. संशोधन केंद्रासाठी लागणारी यंत्रसामग्री कायमस्वरूपी केंद्रात उपलब्ध आहे. प्रा. शर्मा यांना विद्यापीठाकडून वाहन उपलब्ध करून दिले जाते. जर ते मिळाले नाही तर पेट्रोल खर्च दिला जातो. शर्मा यांच्या घरी कोणतीही प्रयोगशाळा नसून तिथे चोरी होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही, असा खुलासा पदार्थविज्ञान विभागाकडून झाला आहे.

2 8 AUG 2017 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
जनसंपर्क कक्ष

# Start-up competition for colleges, varsities in Oct

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** All India Council for Technical Education (AICTE) has asked colleges and universities to participate in a start-up contest to be organised in October. The last date to apply for the contest is August 31.

The direction came in a letter dated August 17, from Anil Sahasrabudhe, chairman of AICTE, to the principal secretary of higher and technical education department of all states. It said that AICTE in collaboration with Vijnan Bharati and with support from other lead government agencies is organising National Start-up summit 2017.

The contest will be under the aegis of India international science festival. The joint event of ministry of science and technology and ministry of earth sciences will be held from October 13 to16 in Chennai.

The 2017 start-up contest is framed under the start-up summit to scout, award and support the best start-ups in academic institutions across the country and reward the best academic institutions supporting start-up ecosystem both in the campus and regional level. Eventually the short listed start-ups and institutions will receive the opportunity to attend and participate in a 2017 start-up summit.



**The contest will be under the aegis of India international science festival. The joint event of ministry of science and technology and ministry of earth sciences will be held from October 13 to16 in Chennai**

The concerned officials have been asked to disseminate the relevant information and encourage innovators, entrepreneurs, early age start-ups, faculty led start-ups and start-ups supported in universities and academic institutions to apply under the appropriate contest categories by August 31.

The letter further added that for online submission and further instructions, one may visit the online portal— www.startup.aicte-india.org.

A city based college principal said that the initiative from the AICTE said that it is a much needed activity from the apex body. It will encourage students, faculties and universities to try their hand at start-ups.

The principal said, "Many students from Kolhapur or from other nearby cities are innovative enough to start their own start-ups. Many have already started their own start-ups and are receiving a good response. For them the contest is the best opportunity to showcase their work. It will surely bring them into the limelight and help boost their career."